नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/07/2023 (शनिवार) सकाळ

## बॅटरी चोरी

**पो.स्टे. भिवापूर** :— अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा मालेवाडा येथे दिनांक १३/०५/२०२३ चे ११.०० वा. ते १५.०० वा. दरम्यान नमुद घटनास्थळी येथील जिओ टॉवरची बॅटरी ०४ व भिवापुर टाऊन मधील बॅटरी ०२ असा एकुण १,५०,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— प्रशांत नामदेवजी वालुलकर, वय ३४ वर्ष रा. रा. केयर ऑफ अमीत मुटकुरे प्लॉट क्र. १२२ कामगार नगर रमना मारोती मंदीरा जवळ पोलीस स्टेशन नंदनवन नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापूर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रफुल माहुरे मो. नं. ७७४१९४१२०१ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावरील मौजा खानगाव शिवार येथे दिनांक १९/०७/२०२३ चे १०/०० वा. पुर्वी फिर्यादी नामे— मंगेश विलासराव शेगावकर, वय ४४ वर्ष रा. एम. एस. ई. बी. ऑफीस काटोल ता. काटोल हे एम. एस. ई. बी. ऑफीस काटोल येथे कनिष्ठ अभियंता म्हणुन कार्यरत असुन यातील फिर्यादी हे ऑफीसमध्ये हजर असता फोनद्वारे केबल चोरी व पाईप चोरी बाबत फोनवर लाईनमॅन वाघे यांनी दिलेल्या माहीती वरून घटनास्थळी गेले असता खानगाव शिवारात नहराला लागुन असलेल्या हायवे रोड क्रॉसिंगचे जवळील ईलेक्ट्रीक लाईटचे लोखंडी पोलवर गेलेला भुमीगत केबल ९ मिटर (240Sqmm 11KV) उच्च दाब वाहीनीचे केबल तसेच ६ इंच जि. आय. पाईप अंदाजे एकुण किंमती अंदाजे १५९००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार पवन वाघमारे पो.स्टे. काटोल हे करीत आहे.

## लोखंडी गेट चोरी

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील मौजा उबगी शिवार येथे दिनांक १६/०७/२०२३ चे २०/०० वा. ते दिनांक १७/०७/२०२३ चे १६/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– महेंद्र नारायणराव कामडी, वय ६८ वर्ष रा. तेलीपुरा सिताबर्डी नागपूर यांचे शेतात काम करणारा चौकीदार याने फिर्यादीस फोन द्वारे सांगितले की, त्यांचे शेतात ठेवलेला लोखंडी गेट दोन पल्ले वजन अंदाजे १०० किलो किंमती अंदाजे ४०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भुक्ते मो. नं. ९८२३६१२८५८ हे करीत आहे.

पोलीस माहिति कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर